**प्रतिवादीतर्फे ॲड. डी.व्ही. देशमुख वादी क्र.१ चा उलटतपास शपथेवर सुरु–**

१. हे म्हणणे खरे आहे की, पुर्ण गट नंबर १०७ ही मिळकत वडिलोपार्जीत आहे. काशिनाथ पोटे हे माझे आजोबा आहेत. माझ्या आजोबांना दादासाहेब, भिमराज व नंदराम असे तीन भाऊ होते. चौघांमध्ये दादासाहेब मोठे होते. हे म्हणणे खरे आहे की, काशिनाथ हे त्यांच्या एकत्र कुटुंबाचा कर्ता होते. हे म्हणणे खरे आहे की, पुढे सोईसाठी काशिनाथ यांनी स्वतःच्या तसेच इतर भावांच्या मुलांच्या नावे वहिवाटीसाठी शेतजमीन करुन दिली. हे म्हणणे खरे आहे की, त्या वहिवाटीप्रमाणे तलाठयाने गट नंबर पाडले. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर काही मिळकत काशिनाथ याच्या नावे राहिली. हे म्हणणे खरे आहे की, काशिनाथ मयत झाल्यानंतर आजपर्यंत त्यांच्या मिळकत वारसांची नावे लागलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, काशिनाथ यांच्या नावे असलेली मिळकत एकत्र कुटुंबाचीच असल्याने त्यास आतापर्यंत वारसांची नावे लागलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक १०७ चे आतापर्यंत वाटप झालेले नाही. मोजणी कार्यालय यांच्याकडून गट नंबर १०७ या संपुर्ण गटाची मोजणी करावी लागेल असे सांगितल्याने व मला गट क्रमांक १०७/१/अ आणि १०७/१/ब या गटाच्या हद्दी निश्चित करुन हव्या असल्याने मी सदरचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला संपुर्ण गट क्रमांक १०७ याच्या मोजणीकरीता आकारली जाणारी फी भरावी लागेल म्हणुन मी हा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींने बांधावरुन वाद होत असल्याने माझ्याकडे मोजणीची मागणी केली होती, परंतु, मी त्यास तयार झालो नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.१०७ या संपुर्ण गटाची मोजणी होवून हद्दी निश्चित करण्यास मी

तयार आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

स्वाक्षरीत/–

(**संध्या यु. सुळ**)

दिनांक–१८/१०/२०२४.

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

नेवासा